**Lewa Educational Unions**
**Dr. Annasaheb G. D. Bendale Mahila Mahavidyalaya, Jalgaon**
**Jilha Road, Jilha Peth, Jalgaon**
**NAAC Re-Accredited 'A' Grade (3.12)**
**Phone : (0257) 2236051**

Estd : 1984

---

# Report on Patriotic Production: "Ratan"

**Name of the Programme: Patriotic Production: "Ratan"**

**Date of the Programme:** 01/12/2022 & 10/02/ 2022

**Organising unit/collaborating agency**: Dr.A.G.D.B.M.M.College, and KBCNMU,Jalgaon

**Venue of the Programme:** Sambhaji Theatre, Jalgaon College Campus

**Brief Summary of the Programme:**

The production by the College Drama Department and KBCNMU, Jalgaon collaboratively titled "Ratan," was a poignant and inspiring exploration of patriotism and the sacrifices made by individuals for the greater good of the country. The play, set against a backdrop of historical events, successfully conveyed a sense of national pride and unity through compelling performances, meticulous production design, and a well-crafted narrative. The Drama Department's choice of a patriotic theme aimed to instill a sense of pride and reflection among the audience while showcasing the artistic prowess of the students and faculty involved. This patriotic drama was first performed in the Sambhaji Theatre, Jalgaon on 01 December 2022. Second performance of the play was held in the college on 10th February 2022. The lead actress, Prof. Suchitra Londhe, Faculty, dept. of Drama, effectively conveyed the struggles and triumphs of characters representing different facets of national history. The ensemble cast exhibited a strong sense of unity, contributing to the overall impact of the production.

Dr. Sujata Gaikwad
विद्यार्थी विकास अधिकारी
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय,जळगांव


६१ हौशी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा-२०२२
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय,जळगाव निर्मित
मराठी दोन अंकी नाटक
इतिहासात दडलेली वास्तवता....
रतन...
लेखक : डॉ.जयेंद्र लेकूरवाळे
दिग्दर्शन : प्रा.सुचित्रा लोंढे
निर्मितीः डॉ.गौरी राणे, प्राचार्य- डॉ.अ.जी.डी.बेंडाळे म.महाविद्यालय,जळगांव
FILM & DRAMATICS DEPARTMENT, JALGAON
दिनांक:०१.१२.२०२२ रोजी सायं.-७ वा., छत्रपती संभाजीराजे नाट्यगृह, जळगाव





epaper.lokmat.com/a

**लोकमत**

# 'रतन...' गाथा देशभक्तीची!

नाट्य परीक्षण
ॲड. प्रवीण पांडे


'रतन' या नाटकातील एक क्षण. (सचिन पाटील)

**जळगाव:** राज्य नाट्य स्पर्धेत काल डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव यासंस्थेच्या वतीने डॉ.जयेंद्र लेकुरवाळे लिखीत व प्रा.सुचित्रा लोंढे दिग्दर्शित 'रतन' हे नाटक सादर झाले. १३ एप्रिल १९१९ रोजी पंजाबमध्ये घडलेल्या जालियनवाला बाग येथील हत्याकांडामुळे इंग्रज सरकारचा क्रुर आणि अत्याचारी चेहरा समोर आला. याच हत्याकांडाची पार्श्वभूमी असलेले सदरचे नाटक लेखकाने सादर केले. या हत्याकांडात आपला देशभक्त पती 'छज्जू' याला गमावते.

सर्वस्व गमावलेली 'रतन' इंग्रजांना न जुमानता देशसेवेसाठी पतीच्याच मार्गाने पुढे जाण्याचे ठरवते. नाटक संपते. दिग्दर्शक म्हणून डॉ.जयेंद्र [illegible]

[illegible] ती गती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. अभिनयाच्या बाबतीत प्रा.सुचित्रा लोंढे यांनी 'रतन' मेहनतीने साकारत रसिकांची दाद मिळवली. काही ठिकाणी मात्र आवाजाची चढउतार आवश्यक, असो. मयुर पाटील यांचा 'छज्जू' उत्तम. जयंत नेवे (बाउजी), डॉ.सविता नंदनवार (माताजी), डॉ.जयेंद्र लेकुरवाळे (राजिंदर), प्रियंका आठे (परमिंदर कौर), नीता वाल्हे (रज्जो), ऐश्वर्या परदेशी (कम्मो), दिपक पवार, डॉ.अंकीता दुबे, सारेच कलावंत आपआपल्या भूमीकेशी समरस. [illegible]

आजचे नाटक : मुसक्या
सादरकर्ते : कै.शंकररावजी काळुंखे चॅरिटेबल ट्रस्ट,जळगाव.

नाटकास पूरक. गायत्री सोनार यांचे पार्श्वसंगीत नाटकास अनुसरुन. रुपाली भोळे (रंगभूषा), अनिता नांदेडकर (वेशभूषा) कौतुकास्पद. डॉ.विनोद नन्नवरे सहीत सा-यांची रंगमंच व्यवस्था चोख. विषयाच्या वैविध्याने नटलेली राज्यनाट्य स्पर्धा डौलाने वाटचाल करते आहे. रसिकांना भारावून टाकणाऱ्या आजच्या नाटकास उत्स्फूर्त प्रतिसादही लाभला. उत्तम सादरीकरणासाठी अभिनंदन व [illegible]

Hello Jalgaon
Page No. 4 Dec 02, 2022
Powered by: erelego.com

## 'रतन एक हुंकार'ने रसिकांना खिळवले


शहरातील बेंडाळे महाविद्यालयात शनिवारपासून देवगिरी फिल्म फेस्टिव्हल होत आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जालियनवाला बाग घटनेवर आधारित डॉ. जयेंद्र लेकुरवाळे लिखित 'रतन एक हुंकार' हे नाटक शुक्रवारी सादर करण्यात आले. त्यातील हा एक काळजाला भिडणारा क्षण.

**सिटी न्यूज**

दिव्य मराठी • जळगाव, शुक्रवार, २ डिसेंबर २०२२

# 'रतन' स्वातंत्र्य संग्रामाचे यथार्थ दर्शन

नाट्य परीक्षण
सुबोध सराफ, जळगाव

देशप्रेमाने भारलेल्या विषयावर जर एखादी कलाकृती आधारित असेल तर खूप भानावर राहून तो कलाविष्कार सादर करावा लागतो. आणि एखाद्या नाटकाचा विषय जर देशभक्तीपर असेल तर हे भान अधिकच ठेवणे गरजेचे ठरते. डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाने 'रतन' हे नाटक प्रस्तुत केले. जालियनवाला बाग ही घटना आणि त्या संबंधातील काही स्वातंत्र्यवीर हे अनामच राहिले. त्यापैकीच एक रतनदेवी. तिंची ही कहाणी. खूप घटना एकामागून एक घडताना दाखवल्या आहेत. शेतकऱ्यांवरील कर, होमरूल चळवळ, गदर पार्टीचे कार्य, हिंदू-मुस्लिम-शीख ऐक्याचे प्रतीक म्हणून रतनदेवीची मिरवणूक असे अनेक प्रसंग नाटकांत कालांतराने घडतात. लेखक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे स्वातंत्र्य संग्रामाची वातावरण निर्मिती आपल्या लेखणीद्वारे करतात; परंतु विविध प्रसंगांची जुळवाजुळव करताना एकसंध परिणाम नाटक साधताना दिसत नाही. याचे महत्त्वाचे कारण दिग्दर्शक. कारण एका प्रसंगातून वातावरण निर्मिती करताना त्याचा सलग परिणाम हा येणाऱ्या घटनांवर होणे आवश्यक असते. सुचित्रा दिग्दर्शक आणि रतनदेवीच्या अशा दुहेरी भूमिका पार पाडताना दिसतात.

बहुधा यामुळेच नाटकाच्या प्रवाही होण्याच्या आवश्यकतेकडे थोडेसे दुर्लक्ष झाल्याचे जाणवते. नाटकातील समूहनृत्य, रामनवमी मिरवणूक, छज्जू आणि रतन यांच्या लग्नाचा प्रसंग चितारण्यात रंगमंचाचा संपूर्ण वापर होणे आवश्यक होते. महत्त्वाचे म्हणजे नाटकातील भूमिका आणि कलावंत यांचा एकत्रित परिणाम हा साधला जाणे याकडे देखील दिग्दर्शक सुचित्रा लोंढे यांनी अजून मेहनत घ्यायला हवी होती. रजिंदरच्या भूमिकेतील प्रा. जयेंद्र लेकुरवाळे प्रभाव पाडतात. त्यांची भूमिकेची लांबी जरी कमी असली तरी त्यांच्या रंगमंचावरील सहज वावराने रजिंदर भाव खाऊन जातो. मयूर पाटील यांनी छज्जू मोठ्या तडफेने उभा केला. स्वातंत्र्य संग्रामातील मवाळ गटाचे नेतृत्व करताना देखील स्वातंत्र्यवीराचा जोष त्यांनी ताकदीने रंगवला. बाऊजी झालेले जयंत नेवे मात्र काहीसे अवघडलेले दिसले व त्यांच्या रंगमंचावरील हालचाली, देहबोली आत्मविश्वासपूर्ण नव्हती. रतनच्या भूमिकेतील प्रा. सुचित्रा लोंढे देखील संपूर्ण नाट्यात मध्यवर्ती पात्र असूनही पाहिजे तसा प्रभाव त्यांना पाडता आला नाही असेच वाटत राहते. त्यांची भूमिकेची समज मात्र त्यांच्या मुद्राभिनयातून दिसत होती. रंगमंचावरील वावरदेखील सहज होता. बहुधा, दिग्दर्शक म्हणूनही जबाबदारी निभावत असताना स्वतःकडे दुर्लक्ष झाल्यासारखे वाटत होते. नाटकातील काही भूमिकांवर देखील प्रा. सुचित्रा लोंढे यांनी कसून मेहनत घ्यायला हवी होती. लेखक म्हणून जयेंद्र लेकुरवाळे जालियनवाला बाग आणि त्या अनुषंगाने भारतीय स्वातंत्र्याचा घटनाक्रम आणि त्या बरोबरीनेच रतनदेवी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे मिश्रण बेमालूमपणे करतात. प्रा. सुचित्रा लोंढे या नाटकरूपी जहाजाच्या कॅप्टन म्हणून तांत्रिक बाजू त्यांनी समर्थपणे करवून घेतल्या. भाग्यश्री अमृतकर यांचे नेपथ्य विषयाला अनुसरून. वेशभूषा देखील नाटकाला पूरक अशीच होती. अनिता नांदेडकर यांनी विशेष लक्ष दिल्याचे दिसले. प्रकाश योजनेचा वापर अजून कल्पकतेने व्हायला हवा होता. लेखक आणि दिग्दर्शक हे नाटकाचे प्रमुख भाग असतात. 'रतन' या नाटकाचे सादरीकरण या दोन्ही प्रमुख भागांमुळे चांगले झाले. ते अजुनही अधिक प्रभावी होऊ शकले असते.


बेंडाळे महिला महाविद्यालयाने सादर केलेल्या 'रतन' नाटकातील एक क्षण.

**निधन वार्ता**

वैजयंतीबाई दयाराम चौधरी   अनुसयाबाई महिपत इंगळे

**दूध संघ निवडणूक** • राष्ट्रवादीच्या पॅनलमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे दोन उमेदवार

# 'रतन' नाटकातून मांडला स्वातंत्र्यसंग्राम



राज्य नाट्य स्पर्धेच्या जळगाव केंद्रावर गुरुवारी बेंडाळे महाविद्यालयाने 'रतन' हे नाटक सादर केले. त्यातील एक लक्षवेधी क्षण. ■ परीक्षण पान ४

Scanned with CamScanner

सिटी न्यूज

दिव्य मराठी • जळगाव, शुक्रवार, २ डिसेंबर २०२२

# 'रतन' स्वातंत्र्य संग्रामाचे यथार्थ दर्शन

**नाट्य परीक्षण**

सुबोध सराफ, जळगाव

देशप्रेमाने भारलेल्या विषयावर जर एखादी कलाकृती आधारित असेल तर खूप भानावर राहून तो कलाविष्कार सादर करावा लागतो. आणि एखाद्या नाटकाचा विषय जर देशभक्तीपर असेल तर हे भान अधिकच ठेवणे गरजेचे ठरते. डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाने 'रतन' हे नाटक प्रस्तुत केले. जालियनवाला बाग ही घटना आणि त्या संबधातील काही स्वातंत्र्यवीर हे अनामच राहिले. त्यापैकीच एक रतनदेवी. तिची ही कहाणी. खूप घटना एकामागून एक घडताना दाखवल्या आहेत. शेतकऱ्यांवरील कर, होमरूल चळवळ, गदर पार्टीचे कार्य, हिंदू-मुस्लिम-शीख ऐक्याचे प्रतीक म्हणून रतनदेवीची मिरवणूक असे अनेक प्रसंग नाटकात कालांतराने घडतात. लेखक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे स्वातंत्र्य संग्रामाची वातावरण निर्मिती आपल्या लेखणीद्वारे करतात; परंतु विविध प्रसंगांची जुळवाजुळव करताना एकसंध परिणाम नाटक साधताना दिसत नाही. याचे महत्त्वाचे कारण दिग्दर्शक. कारण एका प्रसंगातून वातावरण निर्मिती करताना त्याचा सलग परिणाम हा येणाऱ्या घटनांवर होणे आवश्यक असते. सुचित्रा दिग्दर्शक आणि रतनदेवीच्या अशा दुहेरी भूमिका पार पाडताना दिसतात.



बेंडाळे महिला महाविद्यालयाने सादर केलेल्या 'रतन' नाटकातील एक क्षण.

बहुधा यामुळेच नाटकाच्या प्रवाही होण्याच्या आवश्यकतेकडे थोडेसे दुर्लक्ष झाल्याचे जाणवते. नाटकातील समूहनृत्य, रामनवमी मिरवणूक, छज्जू आणि रतन यांच्या लग्नाचा प्रसंग चितारण्यात रंगमंचाचा संपूर्ण वापर होणे आवश्यक होते. महत्त्वाचे म्हणजे नाटकातील भूमिका आणि कलावंत यांचा एकत्रित परिणाम हा साधला जाणे याकडे देखील दिग्दर्शक सुचित्रा लोंढे यांनी अजून मेहनत घ्यायला हवी होती. रजिंदरच्या भूमिकेतील प्रा. जयेंद्र लेकुरवाळे प्रभाव पाडतात. त्यांची भूमिकेची लांबी जरी कमी असली तरी त्यांच्या रंगमंचावरील सहज वावराने रजिंदर भाव खाऊन जातो. मयूर पाटील यांनी छज्जू मोठ्या तडफेने उभा केला. स्वातंत्र्य संग्रामातील मवाळ गटाचे नेतृत्व करताना देखील स्वातंत्र्यवीराचा जोष त्यांनी ताकदीने रंगवला. बाऊजी झालेले जयंत नेवे मात्र काहीसे अवघडलेले दिसले व त्यांच्या रंगमंचावरील हालचाली, देहबोली आत्मविश्वासपूर्ण नव्हती. रतनच्या भूमिकेतील प्रा. सुचित्रा लोंढे देखील संपूर्ण नाट्यात मध्यवर्ती पात्र असूनही पाहिजे तसा प्रभाव त्यांना पाडता आला नाही असेच वाटत राहते. त्यांची भूमिकेची समज मात्र त्यांच्या मुद्राभिनयातून दिसत होती. रंगमंचावरील वावरदेखील सहज होता. बहुधा, दिग्दर्शक म्हणूनही जबाबदारी निभावत असताना स्वतःकडे दुर्लक्ष झाल्यासारखे वाटत होते. नाटकातील काही भूमिकांवर देखील प्रा. सुचित्रा लोंढे यांनी कसून मेहनत घ्यायला हवी होती. लेखक म्हणून जयेंद्र लेकुरवाळे जालियनवाला बाग आणि त्या अनुषंगाने भारतीय स्वातंत्र्याचा घटनाक्रम आणि त्या बरोबरीनेच रतनदेवी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे मिश्रण बेमालूमपणे करतात. प्रा. सुचित्रा लोंढे या नाटकरूपी जहाजाच्या कॅप्टन म्हणून तांत्रिक बाजू त्यांनी समर्थपणे करवून घेतल्या. भाग्यश्री अमृतकर यांचे नेपथ्य विषयाला अनुसरून. वेशभूषा देखील नाटकाला पूरक अशीच होती. अनिता नादेडकर यांनी विशेष लक्ष दिल्याचे दिसले. प्रकाश योजनेचा वापर अजून कल्पकतेने व्हायला हवा होता. लेखक आणि दिग्दर्शक हे नाटकाचे प्रमुख भाग असतात. 'रतन' या नाटकाचे सादरीकरण या दोन्ही प्रमुख भागामुळे चांगले झाले. ते अजुनही अधिक प्रभावी होऊ शकले असते.